ePaper

# पंतप्रधान नरेंद्र मोदी आज पुणे भेटीवर!



वर्ष - 7 । अंक - 91 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | मंगळवार , दिनांक 1 ऑगस्ट 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत


- महिला संघाने गोल्ड जिंकले
- OMG 2 चित्रपट फक्त 'प्रौढांसाठीच'!
- लालू कुटुंबावर ईडीची टाच
- दादा कमळाचा प्रचार करणार!




# मेट्रोचे न्यूनतम भाडे 10 रुपये

## » अधिकतम भाडे 35 रुपये; विद्यार्थ्यांना असणार 30 टक्के सवलत

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पुणे मेट्रोची पीसीएमसी ते फुगेवाडी व वनाझ ते गरवारे या मार्गिकेवर मागील वर्षी उद्घाटन झाले. त्यानंतर पंतप्रधान यांच्या हस्ते या दोन्ही मार्गिकांचा विस्तार मंगळवारी केला जात आहे. या विस्तारित मार्गामध्ये फुगेवाडी ते सिव्हिल कोर्ट आणि रुबी हॉल ते गरवारे या मार्गाचे लोकार्पण मोदी यांच्या हस्ते होत आहे.**



या नवीन मार्गाच्या लोकार्पणामुळे पीसीएमसी ते सिव्हिलकोर्ट आणि वनाझ ते रुबी हॉल या मार्गावर प्रवास करणे शक्य होणार आहे. मेट्रोचे न्यूनतम भाडे 10 रुपये असून अधिकतम भाडे 35 रुपये असणार आहे. पीसीएमसी ते वनाझ असा प्रवास करण्यासाठी 40 मिनिटे लागणार आहेत आणि त्यासाठी 35 रुपये भाडे लागेल. तसेच पीसीएमसी ते रुबी हॉल यासाठी 30 रुपये भाडे असेल. वनाझ ते रुबी हॉल यासाठी 35 रुपये भाडे असेल.

विद्यार्थ्यांसाठी भाड्यामधे 30 टक्के सवलत असणार आहे. शनिवार रविवार सर्व नागरिकांसाठी 30 टक्के सवलत असणार आहे.

तसेच मेट्रो कार्ड धारकांसाठी सरसकट 10 टक्के सवलत असणार आहे (मेट्रो कार्ड लवकरच विक्रीस उपलब्ध होणार आहे) पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते फुगेवाडी ते सिव्हिल कोर्ट आणि गरवारे ते रुबी हॉल या मार्गाचे उद्घाटन झाल्यानंतर संध्याकाळी 5 वाजेपासून पीसीएमसी ते सिव्हिल कोर्ट व वनाज ते रुबी हॉल अशी थेट मेट्रो सेवा प्रवाशांसाठी सुरू होईल. सिव्हिल कोर्ट इंटरचेंजचे स्थानकाचा वापर करून पीसीएमसी ते वनाज, पीसीएमसी ते रुबी हॉल असा प्रवास करणे शक्य होईल.

### एक डब्बा महिलांसाठी राखीव

» मेट्रोचे तिकीट काढण्यासाठी विविध पर्याय उपलब्ध करून देण्यात आले आहेत. रोख, क्रेडिट - डेबिट कार्ड डिजिटल वॉलेट, मेट्रो ॲप द्वारे तिकीट खरेदी करता येईल. तिकीट खिडकी, तिकीट वेंडिंग मशीन, व्हाट्सअप इत्यादी पद्धतीने तिकीट प्राप्त केले जाऊ शकते. पीएमपीएमएल द्वारा फीडर बस सेवेचा लाभ उपलब्ध करून देण्यात आला आहे. 3 कोचची ट्रेन असून त्यातील एक डब्बा महिलांसाठी राखीव आहे. दिव्यांगासाठी मेट्रो कोच मध्ये विशिष्ट जागा राखीव ठेवण्यात आली आहे. मेट्रो स्थानक व मेट्रो कोच मध्ये इमर्जन्सी हेल्प बटन ठेवण्यात आली आहे. त्यामाध्यमातून स्टेशन कंट्रोलरशी थेट संपर्क साधता येतो आहे.

# मनोहर भिडेंच्या निषेधार्थ निदर्शने

## » भिडेंना त्वरीत अटक करण्याची मागणी

। पिंपरी ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**मनोहर उर्फ संभाजी भिडे याने राष्ट्रपिता महात्मा गांधी, महात्मा जोतिराव फुले आणि देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू व समाजसुधारक यांच्याबाबतीत केलेल्या गैरवक्तव्यांचा राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने जोरदार निदर्शने करुन निषेध करण्यात आला. भिडे याला या अवमानकारक वक्तव्याबद्दल अटक करुन कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणीही यावेळी करण्यात आली.**



### या आंदोलकांची होती उपस्थिती

» याप्रसंगी शहराध्यक्ष दिपक मानकर , कार्याध्यक्ष प्रदीप देशमुख , बाबा पटील , पुनम पाटील , रूपाली ठोंबरे , पुजा झोळे ,बाळासाहेब बोडके, बाबा धुमाळ , प्रिया गदादे , विनोद ओरसे ,संतोष नांगरे , अब्दुल सत्तार, विनोद पवार , शिवाजी पाडाळे , संतोष बेन्द्रे, वेणू शिंदे, सोनाली गाढे व इतर पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना दिपक मानकर म्हणाले, भारताच्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये महात्मा गांधी हे शेवटच्या श्वासापर्यंत या देशासाठी लढले या राष्ट्रपित्याचा अपमान आपण कोणीही सहन करू शकत नाही. संभाजी भिडे याचे खरे नाव मनोहर भिडे. हे असून ही व्यक्ती संभाजी हे नाव लावून जनतेची का फसवणूक करते याचा शोध धेणे निश्चितच गरजेचे आहे .सदर व्यक्तीस त्वरीत अटक व्हावी याकरीता आम्ही शासनाकडे मागणी करीत आहोत ह्यास त्वरीत अटक न झाल्यास आम्ही सदर व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करणार आहोत . याप्रसंगी बोलताना प्रदीप देशमुख म्हणाले की, संभाजी भिडे याला राष्ट्रपुरुषांच्या बाबतीत अवमानकारक वक्तव्ये करण्याची खोड आहे. ही वक्तव्ये जाणिवपूर्वक केली जात असून यामाध्यमातून दोन समाजामध्ये दंगली घडविण्याचा प्रयत्न केला जात आहे. राज्य शासनाने याची अतिशय गंभीर अशी दखल घेऊन संभाजी भिडे याच्यावर कारवाई करणे गरजेचे आहे. हा देश घडविणाऱ्या विचारधारेचा सतत अवमान करण्याची प्रवृत्ती घातक असून यामुळे देशाची एकता आणि अखंडता याला धोका निर्माण होत आहे.

# हुतात्मा राजगुरू स्मारकास मान्यता

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

राजगुरूनगर येथील हुतात्मा शिवराम हरी राजगुरु स्मारकाच्या विकास आराखड्यास पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने सोमवारी मान्यता प्रदान केली. हा आराखडा मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीच्या मान्यतेसाठी सांस्कृतिक कार्य विभागास सादर करण्यात येणार आहे. विधानभवन येथे आयोजित या बैठकीस आमदार दिलीप मोहिते पाटील, विभागीय आयुक्त सौरभ राव, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर, खेड-राजगुरूनपगरचे उपविभागीय अधिकारी जोगेंद्र कट्यारे, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाचे सहायक संचालक डॉ. विलास वहाणे आदी उपस्थित होते. यावेळी स्मारकाच्या अनुषंगाने तयार केलेल्या विकास आराखड्याचे सादरीकरण वास्तुविशारदांनी केले. या स्मारकाच्या आराखड्याचे टप्पे करुन प्राधान्याने मुख्य भागाच्या विकासावर भर देण्यात यावा, असे पालकमंत्री पाटील म्हणाले. यावेळी आमदार मोहिते पाटील यांनी विविध सूचना मांडल्या. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग मंत्रालय, मुंबई यांच्या 14 मार्च 2023 रोजीच्या शासन निर्णयाद्वारे राजगुरुनगर, जि. पुणे येथील हुतात्मा शिवराम हरी राजगुरु जन्मस्थळ परिसर विकास आराखडा समिती विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली स्थापित करण्यात आली होती. विभागीय आयुक्त सौरभ राव यांच्या अध्यक्षतेखालील समितीने अभ्यासपूर्ण बैठका व स्थळ पाहणी करुन विकास आराखडा तयार केला. यामध्ये जन्मस्थान खोली व मुख्य स्मारक विकास आराखडा हा राज्य पुरातत्व विभागामार्फत तर परिसर विकास आराखडा हा सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत तयार करण्यात आला.

# अधिकारी नियुक्तीचा घोडेबाजार!

## शहराच्या विकासात अडथळा : प्रशासकीय व राजकीय ‘सेटिंग’

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**“पिंपरी-चिंचवड महापालिकेचा गाडा हाकणारे ‘सारथी’ अर्थात उच्च पदस्थ अधिकारी नियुक्त करताना शासकीय आणि प्रशाकीय यंत्रणांच्या हस्तक्षेपाचा अतिरेक शिगेला पोहोचला आहे. परिणामी, आठ-दहा प्रमुख विभागाची जबाबदारी त्या विभागांचा अनुभव नसलेल्या आणि केवळ नियुक्ती मिळाली म्हणून खूर्चीकर्ता झालेला अधिकारी सांभाळतो. त्याचा विपरित परिणाम शहरातील विकासकामांवर होत आहे.**



मर्जीतल्या अधिकाऱ्यांची हव्या असलेल्या विभागात बदली करून आपली कामे मार्गी लावण्याचा उद्योग राजकीय आणि प्रशासकीय यंत्रणा करत आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत नियुक्ति मिळवलेल्या अधिकाऱ्यांना प्रशिक्षण एका विभागाचे अन् काम दुसऱ्या विभागात अशी अवस्था आहे. उदा. महसूल विभागात नियुक्ति झालेला अधिकारी नगरविकास विभागात प्रतिनियुक्तीवर रुजू होतो. त्याच्याकडे विविध विभागांचा ‘चार्ज’ दिला जातो. पण, असा अनुभव शून्य अधिकारी त्या विभागाला न्याय देतो काय? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

वास्तविक, राज्य सरकारच्या विविध विभागांमध्ये रिक्त असणाऱ्या पदांची माहिती घेऊन त्या पदांची भरती करण्यासाठी राज्य सरकार अ-वर्ग दर्जाची पदनिर्मिती करत आहे. त्याद्वारे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत परीक्षा घेतली जाते. त्यानंतर रितसर मुख्य परिक्षा आणि मुलाखत करून रिक्त पदांवर अधिकाऱ्यांची नेमणूक केली जाते. या परीक्षा देताना विशेषतः वर्ग एकच्या पदासाठी संबंधीत उमेदवार आपल्याला हव्या असलेल्या विभागाला पसंतीक्रम देतात. त्यामध्ये उत्तीर्ण झाल्यास संबंधिताला त्याच विभागाचे प्रशिक्षण दिले जाते. प्रशिक्षणानंतर संबंधित अधिकारी रुजू होतो. मात्र, काही कालावधीनंतर तोच अधिकारी सेवा वर्ग करण्यासाठी धडपड करीत असतो. महसूल किंवा आरोग्य विभागाचा अधिकारी राजकीय हस्तक्षेप आणि प्रशासकीय लागेबांधे यामुळे नगरविकास किंवा अन्य विभागात बदली मिळवण्यासाठी ‘साम-दाम’ अशी आयुधे वापरली जातात. मात्र, एखाद्या विभागाचे सखोल ज्ञान नसल्यामुळे प्रशासकीय ओढाताण होते. अधिकाऱ्यांच्या निवडीमध्ये प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे राजकीय आणि प्रशासकीय हस्तक्षेप वाढत आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेमध्ये तीन अतिरिक्त आयुक्त पदांपैकी दोन पदे शासन नियुक्त तर एक पद महापालिकेच्या पदोन्नतीवर अधिकाऱ्याला मिळत आहे. ही पदे नियुक्त करताना देखील हस्तक्षेप झाला आहे का? असा प्रश्न आहे. त्यामुळे सध्या अनुभव नसलेला विभाग अनेक अधिकाऱ्यांना सांभाळण्याची वेळ आली आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवड शहराच्या विकासाला प्रशासकीय अडथडा निर्माण होण्याची भीती आहे.

त्यामुळे शासनाकडून प्रतिनियुक्तीवर आलेल्या अधिकाऱ्यांना त्यांचा अनुभव पाहून विभागात कामासाठी रुजू केले पाहिजे. ज्यामुळे संबंधित विभागाला अनुभवसंपन्न मुख्य अधिकारी मिळेल आणि विकासकामाला चालना मिळेल. मात्र, राजकीय आणि प्रशासकीय हस्तक्षेप आणि ‘सेटिंग’मुळे असे होत नाही. परिणामी, अनुभवसंपन्न प्रामाणिक अधिकाऱ्यांना संधी मिळत नाही किंवा असे अधिकारी ‘घोडेबाजारात’ उडी घेत नाहीत. महापालिका ते राज्य शासन अशा सर्वच स्तरावर होणारा अप्रत्यक्ष हस्तक्षेप रोखण्याची यानिमित्ताने नितांत आवश्यकता आहे.

### हस्तक्षेप अन अतिरिक्त आयुक्ताला ‘वेटिंग...’

» पिंपरी-चिंचवड महापालिकेचे तत्कालीन अतिरिक्त आयुक्त एक जितेंद्र वाघ यांची बदली झाल्यानंतर त्यांच्या जागी विजय खोराटे यांची नियुक्ती झाली. मात्र राजकीय आणि प्रशासकीय हस्तक्षेपामुळे विजय खोराटे यांची नियुक्ती होऊनही त्यांना आठवड्यापेक्षा अधिक कालावधी रुजू होण्यासाठी ‘ वेटिंग’वर रहावे लागले. त्यांना लवकर नियुक्ती दिली नाही. अधिकाऱ्यांच्या नियुक्तीत होणाऱ्या हस्तक्षेपाचे हे एक उदाहरण असून, त्याचा फटका शहरातील विकासकामांवर होत आहे. राज्यातील सध्याची राजकीय परिस्थिती यामध्ये महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह हेसुद्धा दबावाखाली काम करीत आहेत का? असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित केला जात आहे.

# खासगी शाळांना दोन सत्राचे आदेश द्या!

## माजी नगरसेवक तुषार कामठे : उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी निवेदन

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**खासगी शाळेतील व्यस्त शिक्षणपद्धतीचा मुलांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर परिणाम होत आहे. विद्यार्थ्यांना कोवळ्या वयातच हृदयविकारासारखे गंभीर आजार जडत आहे. खासगी शाळा आणि शिकविण्या यामध्ये व्यस्त असणाऱ्या विद्यार्थ्यांना या मधून बाहेर काढणे गरजेचे आहे. यासाठी महापालिकेच्या शाळा प्रमाणे खासगी शाळांचे वर्गही सकाळी ७ ते १२ व १२ ते ५ अशा दोन सत्रात भरविण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी माजी नगरसेवक तुषार कामठे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. .**



माजी नगरसेवक तुषार कामठे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आपल्या राज्याच्या शिक्षण धोरणानुसार आपण महापालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांची वेळ सकाळी ७ ते १२ व १२ ते ५ अशी केलेली आहे. मात्र खासगी संस्थांनी त्यांच्या शाळेची वेळ ८ ते ४ अशी ठेवली आहे. शाळेला जाताना लागणाऱ्या प्रवासाचा वेळ विचारात घेतला तर मुलांचा संपूर्ण दिवस फक्त शाळा आणि ये-जा करण्यातच जात आहे. शाळा सुटल्यानंतर मुलांना खासगी शिकवणीला जावे लागते. शाळा-शिकवणी या व्यस्त वेळापत्रकामुळे मुलांना खेळण्यासाठी, मनोरंजनासाठी वेळ शिल्लक राहात नाही. या सर्व गोष्टींचा परिणाम त्यांच्या बौद्धिक व शारीरिक विकासावर होत आहे. मुलांमध्ये चिडचिडेपणा, आजारपण, मानसिक संतुलन ढासळणे, लहान वयात हृदयविकार अशा गंभीर आजारांना त्यांना सामोरे जावे लागत आहे.

### भावी पिढी कमकुवत होण्याची भिती...



» बालवयात जर बौद्धिक व शारीरिक विकास व्यवस्थित झाला नाही. तर भविष्यात घडणारी पिढी कमकुवत होण्याची शक्यता आहे. ते आपल्या राज्याला व राष्ट्राला परवडणारे नाही. भविष्यातील हा गंभीर धोका ओळखून खासगी संस्थांनीसुद्धा प्राथमिक व माध्यमिक शाळेची वेळ महापालिकेच्या शाळेच्या वेळेप्रमाणे म्हणजेच सकाळी ७ ते १२ व १२ ते ५ अशी करावी, असे आदेश खासगी संस्थांना द्यावेत, अशी मागणी निवेदनाद्वारे केली.



## भूमिका

**इस्रायलबद्दल भारतातील अनेकांना आकर्षण आहे. पण आज हा इस्रायल हुकुमशाहीकडे वाटचाल करतोय. सरकारच्या निर्णयाविरोधात सुप्रीम कोर्टात जाणं, हा लोकशाहीतील महत्त्वाचा अधिकार आहे. पण जनतेचा, विरोधकांचा आणि सैन्याचाही विरोध झुगारून इस्रायल सरकारनं सुप्रीम कोर्टात जाण्याचा हा अधिकार विधेयक मंजूर करून नाकारलाय.**

# इस्रायलची वाटचाल हुकूमशाहीच्या दिशेने




यामुळे इस्रायलमधे आंदोलन सुरू असून तिथं अनागोंदी माजू शकते. विचारांचा समतोल हे लोकशाही राज्यपद्धतीचं मुख्य लक्षण आहे. तो ढळला की, लोकशाही देखील डळमळू लागते. संसद, न्यायालये आणि मुक्त प्रसारमाध्यमे हे लोकशाहीचे आधारस्तंभ असतात. या तिन्हीमधे लोकांच्या विचारांचे प्रतिबिंब दिसत असलं 'की लोकशाही सुरळीत चालू राहते. त्यामुळे लोकशाहीत लोकमताच्या अनादराला काहीही स्थान नसतं.

कित्येकदा लोकमत हे खूप एकारलेलं आणि असहिष्णू असतं. त्यावेळेला त्यावर सर्वांगीण चर्चा आणि विचारविनिमय करून निर्णय घेणं, हा उपाय असतो. पण सत्ता राबवणाऱ्यांना लोकशाहीच्या या वैशिष्ट्यांची नेहमीच बूज असते असे नाही. मग, ते या सर्व प्रक्रिया आणि परंपरांना छेद देऊन आपली मनमानी करतात आणि लोकशाहीच धोक्यात आणतात. इस्रायलमधे सध्या तसंच घडतंय. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी सरकारच्या वादग्रस्त निर्णयावर विचार करण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा अधिकार काढून घेणारा एक कायदा, बिनविरोधपणे इस्रायलच्या संसदेत संमत करून घेतला. सरकारच्या या कृतीला देशभरातून प्रचंड विरोध होत आहे. या विरोधात सामान्य लोक, वृत्तपत्रं, एवढेच काय तर इस्रायली सैनिकही सामील झाले आहेत.

इस्रायलमधे सध्या उजव्या विचारांच्या पक्षांचे आघाडी सरकार आहे आणि त्याला बहुमत आहे. त्यामुळे संसदेत हा कायदा बहुमतानं संमत होणार हे उघडच होते.

पण बहुमत हा कधी कधी मूर्खांचा बाजार असतो, हे लक्षात घेऊन विरोधी पक्षांनी या कायद्यावरच्या मतदानावर बहिष्कार टाकला. ते सामान्य जनतेच्या रस्त्यावरील आंदोलनात सामील झाले. पण नेतान्याहू सरकार बहुमतानं एवढे बेधुंद झाले आहे की, त्याने या विरोधाला दाद न देता एकतर्फीपणे हा कायदा संसदेत संमत करून घेतला.

या कायद्यामुळे सरकारला कोणत्याही उत्तरदायित्वाशिवाय कोणताही निर्णय घेण्याचे अनिर्बंध अधिकार मिळणार आहेत. ही एक प्रकारे हुकूमशाहीच आहे, लोकशाहीत सरकारला जाब विचारण्याचा जनतेला अधिकार असतो आणि जनता ही विविध राजकीय, संसदीय आणि न्यायालयीन व्यासपीठावरून असा जाब विचारत असते. त्यामुळे लोकशाहीत निर्णय एकतर्फी अथवा 'एककल्लीपणे सरकारला घेता येत नाहीत. पण नेतान्याहू सरकार अशा कोणत्याही व्यासपीठाला दाद देण्याच्या मन:स्थितीत दिसत नाही. सर्वोच्च न्यायालयात सरकारच्या कोणत्याही निर्णयाला आव्हान देता येते. हा निर्णय घटनाबाह्य आहे की नाही यावर सर्वोच्च न्यायालय अशक्य संविधानाच्या चौकटीत विचार करते आणि निर्णय देते. पण नेतान्याहू सरकारनं बहुमताच्या जोरावर हा कायदा संमत करून सर्वोच्च न्यायालयाचा हा अधिकारच काढून घेतला आहे.

इस्लायलला लिखित संविधान नाही, पण अपरिवर्तनीय असे काही मूलभूत कायदे आहेत. सरकारचा हा निर्णय या मूलभूत कायद्यांना धक्का लावणारा आहे, अशी चर्चा चालू आहे.

नेतान्याहू यांच्यावर भ्रपटाचाराचे आरोप आहेत. त्यावर न्यायालयात निर्णय व्हायचे आहेत, अशा अवस्थेत सरकार न्यायालयांना निर्बंध घालणारे असे अधिकार आपल्या हातात घेणार असेल तर न्यायव्यवस्थेला अर्थच राहणार नाही, असे विरोधकांचे म्हणणे आहे. नेतान्याहू आणि त्यांच्या समर्थकांचे मात्र असे म्हणणे आहे की, जनतेच्या हिताचे निर्णय घेण्याचा हक्क लोकांनी निवडून दिलेल्या 'लोकप्रतिनिधींनाच आहे, हे निर्णय निवडून न आलेल्या न्यायाधीशांना रद्द करण्याचा अधिकार नाही. संसद ही लोकशाहीत सार्वभौम असली तरी हे सार्वभौमत्व अनिर्बंध नाही, हे अनेक लोकशाही देशांनी मान्य केले आहे. चेक अँड बॅलन्स हा लोकशाहीचा आधार आहे आणि हे चेक अँड बॅलन्सचे काम लोकशाहीत विविध पातळीवरून चालत असते.

## संपादकीय »

### निवडता निवडता..

***निर्यातबंदीच्या आपल्या निर्णयाने थायलंड, व्हिएतनामच्या शेतकऱ्यांचे उखळ पांढरे होईल, तर गरीब अफ्रिकी देशांतील अन्नवंचितांचे जगणे अधिक महाग होईल..***

तोळामासा प्रकृती असलेल्यांचे वर्णन करताना “लवंग उष्ण पडते आणि वेलदोडा थंड” असा वाक्प्रचार वापरला जातो. भारतीय अर्थव्यवस्था अशी तोळामासा नक्कीच नाही. तरीही अशा प्रकारचा वाक्प्रचार भारतासंदर्भात वापरला जाण्याचा धोका संभवतो. त्याचे कारण म्हणजे बिगरबासमती तांदळाच्या निर्यातीवर बंदी घालण्याचा आपला निर्णय. तो सरकारने घेतला कारण गेल्या काही आठवड्यांत झालेल्या असमान वृष्टीमुळे तांदळाचे पीक धोक्यात येऊन देशात यंदा तांदळाचा तुटवडा निर्माण होऊ शकतो अशी भीती सरकारला वाटली म्हणून. उन्हाळा तीव्र होता म्हणून गहू निर्यातबंदी झाली. पाऊस जास्त म्हणून तांदूळ निर्यातबंदी. अशा तऱ्हेने काही महिन्यांवर असणारा हिवाळाही असाच अतिरेकी थंडी घेऊन आल्यास कशाच्या निर्यातीवर बंदी येणार असा प्रश्न पडणे साहजिक.

**रुढ अर्थानं औपचारिक शिक्षण न झालेल्या, उपेक्षित समाजात जन्मलेल्या माणसाचं साहित्य विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात लागतं, त्यांच्या शब्दांनी संयुक्त महाराष्ट्राची चळवळ घराघरात पोहचते, त्यांच्या साहित्याचा जगभर गौरव होतो, रशियासारख्या देशात त्यांचा पुतळा उभा राहतो, असे अण्णा भाऊ साठे आज काहीसे विस्मृतीत गेले आहेत.**

# अण्णा भाऊ साठे समजून घ्यायला हवेत!

वास्तविक, प्रत्येक मनुष्याची प्रतिभा विकसित व्हायला समान संधी मिळायला हवी. संयुक्त राष्ट्रांसारख्या जागतिक संघटनेनं तसेच आपल्या देशाच्या संविधानानं ते ठळकपणे नमूद केलं आहे. मात्र आर्थिक स्थिती आणि विशेषकरुन जातिव्यवस्था हे घडू देत नाही. भारतीय उपखंडाला विषमतेवर आधारलेल्या जातिव्यवस्थेनं जराजर्जर केलं. आपले कायदे, योजना यांनी आज तुलनेनं फरक पडला असला तरी त्यातून आपली पूर्ण सुटका अजून झालेली नाही.

जोवर लग्न करताना माणसं जातीतच स्थळ शोधतात तोवर जात गेली असं म्हणता येणार नाही. माणसांना जखडून टाकणाऱ्या जातींच्या या उतरंडीत अगदी तळाला असलेल्या, एकेकाळी अस्पृश्य गणल्या गेलेल्या मातंग समाजात अण्णा भाऊ जन्माला आले. आयुष्यभर जातीचं आणि त्यातून आलेल्या वेदनेची जखम अंगावर



मिरवतच अण्णांनी आपल्या शब्दांना वैश्विकतेची धार दिली. आज ते शब्द पीएचडीवाली पोरं अभ्यासताहेत. अण्णा भाऊंच्या जन्माच्या जवळपास पाऊण शतक आधी महात्मा फुले-सावित्रीबाई फुलेंनी सुरु केलेल्या मुलींच्या शाळेत शिकलेली मुक्ता साळवे मातंग समाजातली. मुक्ताचा ‘ज्ञानोदय’ मासिकामध्ये १ मार्च १८५५ ला "मांगमहारांच्या दुःखाविषयी निबंध" या शीर्षकाखाली एक लेख प्रसिद्ध झाला होता.

सांगली जिल्ह्यातल्या वाटेगावात १ ऑगस्ट १९२० रोजी जन्माला आलेले प्रतिभावान साहित्यिक, कलावंत, कार्यकर्ता असलेले अण्णा भाऊ साठे मुंबई या त्यांच्या कर्मभूमीतच १८ जुलै १९६९ ला आपला जीवनप्रवास संपवतात. अवघ्या ४९ वर्षाच्या छोट्या कारकीर्दीत त्यांनी आपल्या कतृत्त्वानं एवढं काही लिहून ठेवलंय की, त्यावर पुढल्या अनेक पिढ्या विचार करताहेत.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, दिवसाही पुरेसा उजेड नसलेल्या झोपडीत, रॉकेलच्या दिव्याच्या प्रकाशात अण्णा भाऊ साठेंनी आपलं बहुतेक साहित्य लिहिलं. ते प्रचंड आहे. वैविध्यपूर्ण आहे. त्यांनी एकूण ३२ कादंबऱ्या लिहिल्या. त्यातल्या ७ कादंबऱ्यांवर सिनेमे निघाले. त्यांनी लघुकथा लिहिल्या. त्यांचे २२ कथासंग्रह आहेत. लोकनाट्यासाठी लिहिलेले वग, नाटिका यांची १६ पुस्तकं आहेत. त्यांनी केलेल्या रशियाच्या प्रवासाचं वर्णन करणारं एक पुस्तक आहे. याशिवाय त्यांची गीतं, छक्कड, लावणी, पोवाडे हे पद्यलेखन बरेच आहे. त्यातल्या काही कृतींची नावं पाहू.

## ।। अभंगवाणी ।।



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥

नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# दादा कमळाचा प्रचार करणार!

## » बावनकुळे पंडित केव्हापासून झाले : छगन भुजबळ

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आगामी लोकसभा निवडणुकीत उपमुख्यमंत्री अजित पवार कमळाचा प्रचार करताना दिसतील, असा दावा भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे. त्यांच्या यासंबंधीचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी बावनकुळे यांना टोला हाणला आहे.**

बावनकुळे पंडित केव्हापासून झाले हे मला कळालेच नाही, असे ते म्हणाले. अजित पवार यांनी महिन्याभरापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये बंडखोरी केली. ते शिंदे - फडणवीस सरकारमध्ये सामील झाले. ते एवढ्यावरच थांबले नाही. काही ज्येष्ठ नेत्यांना सोबत घेत त्यांनी पक्षावरही दावा सांगितला. या नव्या राजकीय मैत्रीवर भाष्य करताना भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आगामी लोकसभा व विधानसभा निवडणुकीत अजित पवार कमळासाठी मतदान मागतील असे विधान केले. आगामी लोकसभा निवडणुकीत अजित पवार कमळाचा प्रचार करतील. कमळाला मत द्या म्हणून भाषण करतील. कारण, आम्ही महायुती म्हणून एकत्र आलोत. त्यामुळे





आम्ही सुद्धा शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रचार करू, असे ते रविवारी परभणी जिल्ह्यातील पाथरी येथील कार्यक्रमात संवाद साधताना म्हणाले. यावेळी त्यांच्या या विधानाला कार्यकर्त्यांनी खळखळून हसून दाद दिली. ते स्वतःही यावर खूप हसले. चंद्रशेखर बावनकुळे यांचा हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबल यांनी त्यांना उपरोधिक टोला हाणला. ते म्हणाले की, बावनकुळेंना सर्वकाही दिसत आहे. त्यांना भविष्यातीलही दिसत आहे. ते पंडित केव्हापासून झाले हेच मला कळत नाही. अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आहेत. तसेच ते उपमुख्यमंत्रीही आहेत. त्यामुळे ते केवळ राष्ट्रवादी काँग्रेसचाच प्रचार करतील.

दुसरीकडे, अजित पवारांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादीचा गट भाजप प्रणित एनडीएचा अधिकृत सदस्य आहे. त्यानुसार, अजित पवार व प्रफुल्ल पटेल यांनी एनडीएच्या बैठकांनाही हजेरी लावली आहे. त्यामुळे हा गट यापुढे महायुतीचा घटकपक्ष म्हणूनच निवडणुकांना सामोरे जाईल, असा अंदाज आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मंगळवारच्या पुणे दौऱ्यावरून चांगलेच राजकारण तापले आहे. या दौऱ्यात मोदी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासोबत एकत्र येणार आहेत. यामुळे महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये चलबिचल सुरू झाली आहे. काँग्रेस व शिवसेनेच्या ठाकरे गटाच्या नेत्यांनी या प्रकरणी पवारांना मोदींसोबत व्यासपीठ शेअर करण्यापूर्वी एकदा विचार करण्याचा सल्ला दिला आहे.

### शरद पवार, नरेंद्र मोदी एका मंचावर

» पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना उद्या पुण्यात लोकमान्य टिळक पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. यावेळी शरद पवार त्यांच्यासोबत व्यासपीठावर असतील. राष्ट्रवादी काँग्रेसमधील बंडखोरीनंतर प्रथमच हे दोन मोठे नेते एका मंचावर असतील. काँग्रेस नेत्या वर्षा गायकवाड यांनी या प्रकरणी पवारांना या कार्यक्रमापासून स्वतःला दूर ठेवण्याची विनंती केली आहे.

# मिशी कापणाऱ्याला बक्षीस

## » संभाजी भिडेंची मिशी कापणाऱ्याला 1 लाख

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज

**समता परिषदेचे माजी जालना जिल्हाध्यक्ष नवनाथ वाघमारे यांनी तर संभाजी भिडेंची मिशी कापणाऱ्याला बक्षीस जाहीर केले आहे. संभाजी भिडे यांनी देशात अशांतता पसरवण्याचे काम करत आहेत. संभाजी भिडे हे महापुरुषांबाबत दररोज वेगवेगळे वक्तव्य करत आहेत. त्यामुळे भिडेंची मिशी कापणाऱ्याला ओबीसी समाजाकडून वर्गणी करून एक लाखांचे बक्षिस देण्याची घोषणा नवनाथ वाघमारे यांनी केली आहे.**

या संदर्भात वाघमारे म्हणाले की, 'महाराष्ट्रातील महापुरुषांबद्दल नेहमीच बेताल वक्तव्य करणाऱ्या संभाजी भिडे यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी व क्रांतीसुर्य महात्मा जोतिबा



फुले, लाखों भक्तांचे श्रद्धा असलेले देवस्थान शिर्डीचे साईबाबा व राजा राममोहन राय यांच्यासह अनेक महापुरुषांच्या विषयी अपशब्द वापरले आहेत.

तरी देखील राज्यातील भाजप सरकार आणि राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस त्याला पाठीशी घालत आहेत. सरकार जर अशा प्रवृत्तीच्या व्यक्तींना पाठीशी घालत असेल तर जनतेने त्याला धडा शिकवला पाहिजे.

संभाजी भिडे सारख्यांकडून समाजात वाद निर्माण होईल अशी वक्तव्य थांबवली गेली पाहिजेत म्हणून जो कोणी या संभाजी भिडेची मिशी कापेल त्याला मी एक लाख रुपयाचे बक्षीस देईल, असे आव्हान समता परिषदेचे माजी जिल्हाध्यक्ष, ओबीसी नेते नवनाथ वाघमारे यांनी सोशल मीडियाद्वारे केले आहे.

### भिडे गुन्हेगार की संत सांगा : चव्हाण

» माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी संभाजी भिडेंनी महात्मा गांधींविषयी केलेल्या वादग्रस्त विधानांवर आक्रमक भूमिका घेतली आहे. या प्रकरणी त्यांनी राज्य सरकारवर विविध प्रश्नांची सरबत्ती करत भिडेंवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. संभाजी भिडे नावाचा व्यक्ती देश पेटवायला निघाला असताना आम्ही स्वस्थ बसायचे का?, असा सवाल त्यांनी या प्रकरणी उपस्थित केला आहे. संभाजी भिडे यांनी महात्मा गांधी व त्यांच्या वडिलांविषयी एक वादग्रस्त विधान केले होते. त्याचे राज्यभरात तीव्र पडसाद उमटलेत. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्यासह काँग्रेसचे अनेक नेते या प्रकरणी रस्त्यावर उतरलेत. त्यांनी या प्रकरणी भिडेंवर कारवाई करण्याची मागणी केली. त्यानंतर पृथ्वीराज चव्हाण व काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर यांना जीवे मारण्याची धमकी मिळाली. या पार्श्वभूमीवर चव्हाण यांनी राज्य सरकारवर निशाणा साधला आहे. मनोहर कुलकर्णीला (संभाजी भिडे) पैसे कोण देते? त्याची संघटना कोण चालवते? उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणी भिडेंनी कायदा मोडला की नाही हे सांगावे. तेलात कुणी काडी टाकणार असेल, तर आम्ही गप्प बसायचे का? हा व्यक्ती देश पेटवायला निघाला असता आम्ही स्वस्थ कसे बसायचे? त्याने स्वतःचे नाव का बदलले? एखादा व्यक्ती दुसऱ्या नावाने काहीतरी करतो, एखाद्या समाजाला आपल्याकडे खेचण्यासाठी नाव बदलून त्यांची फसवणूक करतो, असे प्रकार आम्ही सहन करणार नाही, असेही चव्हाण यावेळी म्हणाले.

# हायकोर्टाचे राज्य सरकारला निर्देश

। मुंबई। महाईन्यूज । प्रतिनिधी।

मुंबई उच्च न्यायालयाने सोमवारी एका प्रकरणात सुनावणी करताना राज्य सरकारला राज्यपाल नियुक्त 12 आमदारांच्या नियुक्तीसंबंधी पुढील 10 दिवसांत शपथपत्र सादर करण्याचे निर्देश दिलेत. तत्कालीन मविआ सरकारने शिफारस केलेल्या 12 आमदारांच्या नियुक्तीचा मुद्दा जैसे थे राहील, असेही कोर्टाने या प्रकरणी नमूद केले आहे. विधान परिषदेतील राज्यपाल नियुक्त 12 आमदारांच्या नियुक्तीचा तिढा गत 3 वर्षांपासून प्रलंबित आहे.

या प्रकरणी सोमवारी मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी झाली. या प्रकरणी एक याचिका नव्याने दाखल केली आहे. त्यावर सुनावणी करताना हायकोर्टाने राज्य सरकारला आपली भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश दिले. त्यानंतर सुनावणी 21 ऑगस्टपर्यंत स्थगित केली.

यावेळी कोर्टाने राज्य सरकारला पुढील 10 दिवसांत आपली बाजू प्रतिज्ञापत्राद्वारे स्पष्ट करण्याचेही निर्देश दिले तत्पूर्वी झालेल्या सुनावणीत राज्य सरकारच्या महाधिवक्त्यांनी 12 आमदारांच्या शिफारशीच्या मुद्यावर सरकारने अद्याप कोणताही निर्णय घेतला नसल्याचे स्पष्ट केले.

सर्वोच्च न्यायालयाने गत आठवड्यात राज्यपाल नियुक्त 12 आमदारांच्या निवडीचा मार्ग मोकळा केला. त्यात कोर्टाने या प्रकरणातील मुख्य याचिकाकर्ते रतन सोली यांना याचिका मागे घेण्याची मुभा दिली. तर अन्य एक याचिकाकर्ते सुनील मोदी यांना हाय कोर्टात जाण्याची परवानगी दिली.

त्यानुसार हा वाद आता हाय कोर्टात पोहोचला आहे. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिलेल्या 12 आमदारांच्या यादीवर सर्वप्रथम निर्णय व्हावा. त्यानंतर दुसऱ्या यादीचा विचार केला जावा, अशी मागणी या प्रकरणी याचिकाकर्ते सुनील मोदी यांनी केली आहे.

# मणिपूरवरील चर्चेला बगल!

## » हिंसाचारात आतापर्यंत 150 हून अधिक लोकांचा मृत्यू

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**राज्यसभेत मणिपूरच्या मुद्द्यावर सोमवारी दिवसभराच्या चर्चेसाठी विरोधक आग्रही होते. पण, अल्पकालीन चर्चेसाठी अधिक आक्रमक मागणी सत्ताधारी भाजपकडून होत होती. मणिपूरवर आज चर्चा घ्या, अशी विनंती सभागृह नेते पीयूष गोयल यांनी सभापतींना केली. सत्ताधारी व विरोधक दोघांनाही चर्चा करायची असली तरी नियमांचे विघ्न आड आले आणि चर्चेविनाच वरिष्ठ सभागृह दिवसभरासाठी तहकूब झाले.**

केंद्र सरकारला दिल्लीसंदर्भातील विधेयक मांडायचे असून अविश्वास ठरावाच्या चर्चेची तारीखही निश्चित करायची आहे. पण, राज्यसभेत मणिपूरच्या मुद्द्यावरून कामकाज ठप्प झाले आहे. या कोंडीतून मार्ग काढण्यासाठी सत्ताधारी भाजपने सोमवारी पुढाकार घेत मणिपूरवर चर्चा करण्याची मागणी केली. सभागृहाचे कामकाज सुरू होताच विरोधकांनी नियम २६७ अंतर्गत मणिपूरवर चर्चा करण्याची मागणी केली. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सभागृहात निवेदन देण्याचा आग्रह कायम ठेवला. या गोंधळात केंद्रीयमंत्री व सभागृहाचे नेते पीयूष गोयल यांनी सभापती धनखड यांना, मणिपूरवर सोमवारीच चर्चा घ्या, अशी विनंती केली. या गोंधळात सभागृह दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब झाले. राज्यसभेचे कामकाज पुन्हा सुरू झाले, तेव्हा विरोधकांनी पुन्हा नियम २६७ अंतर्गत चर्चेची मागणी केली. पण, सत्ताधारी भाजपने नियम १७६ अंतर्गत अल्पकालीन चर्चेचा आग्रह धरला. २६७ अंतर्गत दिलेली एकही नोटीस सभापतींनी स्वीकारलेली नाही. मात्र, नियम १७६ अंतर्गत सत्ताधारी सदस्यांच्या नोटिसा स्वीकारण्यात आल्या आहेत. त्यामुळे सभापतींनी नियम १७६ अंतर्गत अल्पकालीन चर्चा दुपारी दोन वाजल्यानंतर घेतली जाईल, असे स्पष्ट केले. माध्यान्ह सुट्टीनंतर सभागृहाचे कामकाज गोंधळात सुरू झाले. नियम १७६ अंतर्गत विरोधक चर्चा करायला तयार नसल्याने सभापतींनी सभागृह तहकूब करून सत्ताधारी व विरोधकांच्या नेत्यांशी चर्चा करून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला. सभापतींच्या दालनातील चर्चा निष्फळ झाल्याचे सभागृहात स्पष्ट झाले. मणिपूरवर विरोधकांनी चर्चा करावी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा सभागृहात उत्तर देतील, असे केंद्रीय संसदीय कामकाजमंत्री प्रल्हाद जोशी यांनी सांगण्याचा प्रयत्न केला. मात्र, विरोधकांनी केंद्रीय मंत्र्यांची विनंती फेटाळली. त्यामुळे सभापतींना सभागृह चर्चेविनाच दिवसभरासाठी तहकूब करावे लागले. मणिपूरच्या मुद्द्यावरून पावसाळी अधिवेशनाचा दहावा दिवसही वाया गेला. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी विरोधकांवर, चर्चेपासून पळ काढल्याचा आरोप केला. विरोधक दररोज वेगवेगळे बोलतात. केंद्र सरकार तयार असतानाही विरोधक चर्चा करत नाहीत, त्यातून विरोधकांचा ढोंगीपणा उघड होतो. मणिपूर-मणिपूर असे ओरडून ते संसदेमध्ये गोंधळ घालत आहेत, अशी तीव्र टीका सीतारामन यांनी संसदेच्या आवारात पत्रकारांशी संवाद साधताना केली. विरोधकांना कशाची तरी भीती वाटत असावी, म्हणून ते पळ काढत आहेत, असे गोयल म्हणाले.



### मणिपूरवर 'इंडिया'ची बैठक

» लोकसभेत सोमवारी सकाळचे सत्र वीस मिनिटांत संपुष्टात आले. दुपारी दोन वाजता विरोधकांच्या गदारोळात केंद्रीय माहिती व प्रसारणमंत्री अनुराग ठाकूर यांनी पायरसीसंदर्भातील सिनेमॅटोग्राफी दुरुस्ती विधेयक संमत करून घेतले. त्यानंतर सभागृह दिवसभरासाठी तहकूब केले गेले. हे विधेयक राज्यसभेत मंजूर झाले आहे. विरोधकांच्या २१ नेत्यांचे शिष्टमंडळ मणिपूरचा दोन दिवसांचा दौरा करून दिल्लीला परतले. या दौऱ्यातील हिंसाग्रस्त भागांतील प्रत्यक्षदर्शी अनुभवांची माहिती त्यांनी विरोधी पक्षांच्या गटनेत्यांना दिली. या बैठकीला काँग्रेसच्या संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधीही उपस्थित होत्या.

# लालू कुटुंबावर ईडीची टाच

## » बिहार , गाझियाबादेतील संपत्ती अटॅच

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) आरजेडी सुप्रीमो लालू यादव आणि त्यांच्या कुटुंबीयांची 6 कोटी 2 लाख रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे. त्यात गाझियाबाद आणि बिहारमधील सर्व संपत्तीचा समावेश आहे. या प्रकरणात लालू प्रसाद, राबडी देवी, तेजस्वी, मीसा, हेमा यांच्यासह आरोपींची यापूर्वीच चौकशी करण्यात आली आहे.**

यापूर्वी दिल्लीच्या राऊज अव्हेन्यू कोर्टात आयआरसीटीसी प्रकरणी सुनावणी झाली होती. या प्रकरणाची पुढील सुनावणी 7 ऑगस्ट रोजी होणार आहे. RJD सुप्रीमो लालू यादव IRCTC (इंडियन रेल टुरिझम अँड केटरिंग कॉर्पोरेशन) निविदा घोटाळ्यात अडकले आहेत. 2004 ते 2009 दरम्यान रेल्वेमंत्री असताना भुवनेश्वर आणि रांची येथे दोन हॉटेल चालवण्याचे कंत्राट एका खासगी कंपनीला बेकायदेशीरपणे दिल्याचा आरोप लालूप्रसाद यांच्यावर आहे. या बदल्यात या कंपनीने त्यांना पाटणा येथील सगुणा मोड भागात 3 एकर जमीन दिली. याप्रकरणी सीबीआयने लालू यादव, राबडी देवी आणि त्यांचा मुलगा तेजस्वी यादव यांच्याविरोधात एफआयआर नोंदवला होता.

या सर्वांना दोन वर्षांपूर्वी जामीन मिळाला होता. IRCTC निविदा घोटाळा प्रकरणात तेजस्वी आणि इतर आरोपींवर IPCच्या कलम 420, 120B आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या विविध कलमांखाली आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे.



### पोलिसांना लाठीचार्ज करावा लागला

लालू प्रसाद रेल्वेमंत्री असताना 2004 ते 2009 दरम्यान रांची आणि पुरी येथील आयआरसीटीसीची दोन हॉटेल्स सुजाता हॉटेल प्रायव्हेट लिमिटेड या खासगी कंपनीला भाड्याने देण्यात आल्याचा आरोप आहे. खासगी कंपनीला हॉटेल भाडेतत्त्वावर देण्याच्या बदल्यात लालू प्रसाद यांच्या कुटुंबीयांनी पाटण्यात कंपनीकडून सुमारे तीन एकर किमतीची जमीन घेतल्याचा आरोप सीबीआयने केला होता.

# एक्स्प्रेस विमानाचे इमर्जन्सी लँडिंग

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

एअर इंडिया एक्स्प्रेसच्या विमानाचे सोमवारी केरळमधील तिरुवनंतपुरम विमानतळावर इमर्जन्सी लँडिंग करण्यात आले. त्यात 154 प्रवासी होते. हे विमान तामिळनाडूतील तिरुचिरापल्ली (त्रिची) येथून शारजाहला जात होते, मात्र वाटेत अचानक तांत्रिक बिघाड झाल्याने विमान केरळ विमानतळाकडे वळवावे लागले. वृत्तसंस्था पीटीआयने दिलेल्या माहितीनुसार, तिरुवनंतपुरम आंतरराष्ट्रीय विमानतळावर सकाळी 10:45 वाजता संपूर्ण आणीबाणी घोषित करण्यात आली.

त्रिची येथून उड्डाण केल्यानंतर लगेचच फ्लाइट क्रमांक IX613 मध्ये तांत्रिक बिघाड झाल्यानंतर विमानतळ प्राधिकरणाने ही घोषणा केली.

लँडिंगबाबत एअर इंडियाच्या प्रवक्त्याने सांगितले की, दुपारी तिरुअनंतपुरममध्ये विमान सुरक्षितपणे उतरले. खबरदारी म्हणून त्याचे इमर्जन्सी लँडिंग करावे लागले. त्यात 154 प्रवासी होते. सर्वांना सुखरूप बाहेर काढण्यात आले.

त्यांच्या इच्छित स्थळी पोहोचण्यासाठी इतर व्यवस्था करण्यात येत आहेत. यापूर्वी 23 जुलै रोजी दुबईला जाणाऱ्या एअर इंडिया एक्स्प्रेसच्या विमानातही तांत्रिक बिघाड झाला होता. यामुळे विमानाचे तिरुवनंतपुरम आंतरराष्ट्रीय विमानतळावर आपत्कालीन लँडिंग करावे लागले. यानंतर प्रवाशांसाठी दुसऱ्या विमानाची व्यवस्था करण्यात आली होती.

# सनी लिओनीच्या शोच्या नावावर 9 कोटींची फसवणूक

बॉलिवूड अभिनेत्री सनी लिओनी, नोरा फतेही, अभिनेता टायगर श्रॉफ, गायक गुरु रंधावा यांसारख्या चित्रपट कलाकारांची लाइव्ह कॉन्सर्ट आयोजित करण्याच्या नावाखाली 9 कोटींची फसवणूक करण्यात आली. ऑनलाइन तिकिटांची विक्री करून फसवणूक करणाऱ्या फायनान्सर आणि तीन आयोजकांना 9 महिन्यांनंतर एसटीएफने अटक केली आहे. लखनऊच्या एकना स्टेडियममध्ये शो आयोजित करण्याच्या बहाण्याने ही फसवणूक करण्यात आली. अटक केलेल्या आयोजकांनी मे-2022 मध्ये श्री सुविधा फाऊंडेशनच्या शो आयोजित करण्याच्या नावाखाली तिकिटे विकली होती. शोच्या काही दिवस आधी आयोजकांनी फोन बंद करून पळ काढला. लखनऊमधील गोमती नगर एक्स्टेंशन पोलिस स्टेशनमध्ये त्यांच्याविरुद्ध तीन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. एसटीएफने जयंती डेरा वालिया, विराज त्रिवेदी, समीर शर्मा यांना अटक केली आहे. रविवारी त्यांना ट्रान्झिट रिमांडवर लखनऊला आणून त्यांची चौकशी करण्यात येत आहे. एसटीएफच्या चौकशीत मास्टरमाइंड विराजने सांगितले की, 12वी उत्तीर्ण झाल्यानंतर त्याने 7 वर्षे कुरिअर कंपनीत डिलिव्हरी बॉय म्हणून काम केले. 1999 पासून पुष्पकने कुरियरची एजन्सी घेऊन 2014 पर्यंत गुजरातमध्ये स्वतःचा व्यवसाय चालवला. यानंतर मुंबईतील मालाड येथे दुसरे कुरिअर कार्यालय सुरू करण्यात आले. 2020 मध्ये



लॉकडाऊन झाल्यानंतर सर्व कामे ठप्प झाली. मास्टरमाइंड विराजने एसटीएफला सांगितले की तो 2021 मध्ये समीर शर्माला भेटला होता. लखनऊमध्ये हॉस्पिटल सुरू करण्याची योजना बनवली. इथल्या हॉस्पिटलचा शोध घेत असताना, मी एकना स्टेडियमवर चॅरिटी शो आयोजित करण्यासाठी स्टेडियमच्या व्यवस्थापकाला भेटलो. स्टेडियममधील शोसाठी 1 कोटी रुपये बुक केले. बुकिंग फायनल झाल्यानंतर, स्टेडियमचे मॅनेजर गौरवने तिची आणि समीरची अमित सिंगशी ओळख करून दिली, जो चॅरिटी शोसाठी स्टार्स बुक करत असे. यानंतर स्टार ठरल्यानंतर शोची तारीख मे-2022 ठेवण्यात आली होती.

# जवानचे पहिले गाणे

शाहरुख खानच्या आगामी जवान चित्रपटातील पहिले गाणे रिलीज झाले आहे. चित्रपटातील जिंदा बंदा हे गाणे सोमवारी दुपारी यूट्यूबवर प्रदर्शित झाले. हिंदीसह तमिळ आणि तेलुगू भाषेतही हे गाणे प्रदर्शित करण्यात आले आहे. गाण्यात शाहरुख अतिशय एनर्जेटिक पद्धतीने डान्स करताना दिसत आहे. गाण्याच्या सुरुवातीला ब्लर दृश्यात शाहरूख पोलिसाच्या गणवेशात दिसतो. हा गणवेश आयपीएस अधिकाऱ्याचा असल्याचे नंतर एका क्लोज शॉटमध्ये दिसते. शाहरुखनेही त्याच्या सोशल मीडिया अकाऊंटवरून हे गाणे शेअर केले आहे. या चित्रपटात शाहरुख डबल रोलमध्ये असेल असा अंदाज प्रिव्ह्यूवरून वर्तवला जात आहे. यात त्याचा टक्कल असलेला लूक चर्चेचा विषय बनला होता. 'जवान' हा शाहरुख खानचा ऍटलीसोबतचा पहिला चित्रपट आहे. या चित्रपटात विजय सेतुपती, नयनतारा आणि दीपिका पदुकोण मुख्य भूमिकेत दिसणार आहेत.



# कंगनाला प्रपोज करणार



बॉलीवूडची क्वीन कंगना रनौत ही नेहमीच तिच्या वेगवेगळ्या कारणांसाठी चर्चेत असणारी सेलिब्रेटी आहे. सध्या कंगना आणि करण जोहरमध्ये जोरदार वाद सुरु झाला आहे. त्याचे कारण करणचा रॉकी और रानी की प्रेम कहानी नावाचा चित्रपट प्रदर्शित झाला आहे. मात्र कंगनाला तो काही आवडलेला नाही. कंगनानं करणनं तोफ डागली आहे. त्याच्याकडे भरपूर पैसा आहे. त्यामुळे तो कलाकारांना भरपूर पैसे देऊन काहीही करायला सांगतो आणि प्रेक्षक ते पाहतात. अशा शब्दांत कंगनानं तिची नाराजी व्यक्त केली होती. अशातच कंगनाच्या बाबत एक आनंदाची बातमी समोर आली आहे. ती म्हणजे तिला एक सुपरस्टार प्रपोज करणार आहे. त्यानं आता कंगनाला प्रपोझ करण्याची वेळ आली आहे. असे त्या सुपरस्टारनं म्हटले आहे. त्याचं काय आहे की, सोशल मीडिया इन्फ्ल्युंसर प्रकाश कुमार उर्फ पुनीत सुपरस्टार आता काही दिवसांपूर्वी बिग बॉस ओटीटी २ मध्ये दिसला होता. आता त्याचे नाव आणखी एका रियॅलिटी शो सोबत जोडले जात आहे. पुनीतनं लाईव्ह सेशनमध्ये सहभागी होण्याबाबत बातचीत केली आहे. काही दिवसांपूर्वी पुनीतचं इंस्टा अकाउंट ब्लॉक झाले होते. त्यामुळे त्याच्या चाहत्यांनी मोठ्या प्रमाणात नाराजी व्यक्त केली होती. पुनीतनं आता म्हटले आहे की, मला काही गोष्टींसाठी गोपनीयता पाळावी लागली. ते महत्वाचे आहे. आता मी खास प्लॅनिंग केले आहे. मला कंगनाच्या लॉक अप २ मध्ये सहभागी व्हायचे आहे. त्यात मी तिला प्रपोझ करणार आहे. ती माझी बऱ्याच दिवसांपासूनची इच्छा आहे. असेही त्यानं म्हटलं आहे. यासगळ्यात कंगना पुनीतला शो मध्ये घेणार का, हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. दुसरीकडे तीन मिलियनपेक्षाही जास्त फॉलोअर्स असणाऱ्या पुनीतचं इंस्टाग्राम अकाउंट ब्लॉक झाले असल्यानं त्याचे चाहते नाराज झाले आहेत. पुनीतनं त्याचे अकाउंट ब्लॉक झाले याला कारण एमसी स्टॅनचे फॅन्स आहेत. असे म्हटले आहे. पुनीत चे चाहते आणि एमसी स्टॅनचे चाहते यांच्यात वाद सुरु झाला होता. त्यामुळे पुनीतच्या अकाउंटविषयी रिपोर्ट करण्यात आला. असेही

# OMG 2 चित्रपट फक्त 'प्रौढांसाठीच'!

बॉलीवूडचा खिलाडी अक्षय कुमारचा ओह माय गॉडचा दुसरा पार्ट आता ऑगस्टमध्ये प्रदर्शित होतो आहे. त्याच्या व्हायरल झालेल्य टीझर आणि गाण्यानं प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतल्याचे दिसून आले आहे. यासगळ्यात काही नेटकऱ्यांनी नेहमीप्रमाणे अक्षय कुमारच्या या चित्रपटावरुन वादाला सुरुवात केली आहे. ओएमजीच्या मेकर्सनं देखील सेन्सॉर बोर्डावर तीव्र शब्दांत आक्षेप घेतला आहे. त्यांचे म्हणणे आहे की, जर बोर्डानं पूर्वीच प्रौढांसाठी असे प्रमाणपत्र दिले आहेत तर आणखी कट्स करायला सांगण्याची गरजच काय आहे असा परखड प्रश्न त्यांनी विचारले आहेत. त्यामुळे येत्या काळात ओमएमजीची अडचणीत वाढ होण्याची शक्यता असल्याची भीती चाहत्यांकडून व्यक्त केली जात आहे. बऱ्याच दिवसांपासून चाहते आपल्या लाडक्या अभिनेत्याची अक्षयच्या चित्रपटाची वाट पाहत आहेत. गेल्या वर्षी आणि यावर्षी अक्षयचे जितके चित्रपट प्रदर्शित झाले ते फ्लॉप झाल्याचे दिसून आले आहे. त्यात त्याच्या अलीकडे प्रदर्शित झालेल्या रामसेतू नावाच्या चित्रपटाचाही समावेश आहे. पृथ्वीराज चौहान, बच्चन पांडे या चित्रपटांनी देखील निराशा केली. तर बेल बॉटमवरुन तो खूपच ट्रोलही झाला होता. ओएमजीच्या







पहिल्या भागाला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. OMG2 मध्ये अक्षयसोबत प्रसिद्ध अभिनेता पंकज त्रिपाठी मुख्य भूमिकेत दिसणार आहे. अक्षय आणि पंकज दुसऱ्यांदा एकत्रित काम करणार आहेत. यापूर्वी ते बच्चन पांडेमध्ये दिसले होते. OMG2 वरुन देखील सोशल मीडियावर वेगळ्या चर्चेला उधाण आले होते. त्यावरुन वादही झाला होता. भगवान शंकर यांचे चित्रिकरण, त्यांचे तांडव आणि रेल्वे स्टेशनवरील तो प्रसंग यामुळे वेगवेगळ्या चर्चांना उधाणही आले होते. दुसरीकडे सेन्सॉर बोर्डानं OMG2 ला फक्त प्रौढांसाठी असे प्रमाणपत्र दिले आहे. त्यात दिग्दर्शकानं बोर्डावर तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली आहे. अमित राय यांनी OMG २ चे दिग्दर्शन केले आहे. त्यांनी बोर्डाला खडे बोल सुनावले आहे. त्यांनी म्हटले आहे की, जर बोर्डानं आम्हाला प्रौढांसाठी असे सर्टिफिकेट दिले आहे तर चित्रपटात आणखी कट्स का सांगितले गेले आहे कळत नाही. अशा शब्दांत राय यांनी त्यांचा राग व्यक्त केला आहे. OMG चा पहिला भाग उमेश शुक्ला यांनी दिग्दर्शित केला होता. OMG मध्ये २२ कट्स सुचवण्यात आले आहेत. याविषयी उमेश यांनी सांगितले की, या चित्रपटाचे जे दिग्दर्शक आहेत ते खूपच संवेदनशील आहेत. मी त्यांच्या पूर्ण टीमचे कौतूकही करतो. त्यांनी खूप मेहनतीनं ही फिल्म तयार केली आहे. मी अजून काही ती फिल्म पाहिलेली नाही. त्यामुळे त्यावर बोलणं उचित ठरणार नाही. असेही उमेश यांनी म्हटले आहे.

# महिला संघाने गोल्ड जिंकले

## स्पेनला 3-0 ने हरवले; प्रो-लीगमध्ये पुरुष संघाला कांस्य

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**भारतीय हॉकी संघाने रविवारी पुरुष आणि महिला अशा दोन्ही गटात यश संपादन केले. महिला संघाने तिरंगी मालिकेत यजमान संघ स्पेनचा 3-0 असा पराभव करत सुवर्णपदक जिंकले. दरम्यान, प्रो-लीगच्या कांस्यपदकाच्या लढतीत पुरुष संघाने नेदरलँड्सचा 2-1 असा पराभव केला.**



### दोन्ही संघ आशियाई स्पर्धेत सहभागी

सप्टेंबरमध्ये होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताचे पुरुष आणि महिला हॉकी संघही सहभागी होणार आहेत. महिला संघ हा जागतिक क्रमवारीत 8 क्रमांकाचा संघ आहे, तर पुरुषांचा संघ हा जागतिक क्रमवारीत 4 क्रमांकाचा संघ आहे. पुरुष संघ हा आशिया खंडातील अव्वल क्रमांकाचा संघ आहे. चीनमध्ये 23 सप्टेंबर ते 8 ऑक्टोबर या कालावधीत आशियाई क्रीडा स्पर्धा होणार आहेत. आशियाई क्रीडा स्पर्धेपूर्वी पुरुष संघ आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफीमध्येही भाग घेणार आहे. ही स्पर्धा 3 ऑगस्टपासून चेन्नईच्या राधाकृष्णन हॉकी स्टेडियमवर खेळवली जाणार आहे.

स्पॅनिश हॉकी फेडरेशनच्या 100 व्या वर्धापन दिनानिमित्त स्पेनमधील बार्सिलोना शहरात महिला हॉकी तिरंगी मालिका आणि पुरुष गटातील 4 संघांची प्रो-लीग आयोजित करण्यात आली होती. महिलांच्या तिरंगी मालिकेतील शेवटचा सामना भारत आणि स्पेन यांच्यात बार्सिलोनाच्या टेरेसा शहरात खेळला गेला. भारताकडून वंदना कटारिया (22वे मिनिट), मोनिका (48वे मिनिट) आणि उदिता (58वे मिनिट) यांनी गोल केले. स्पेनच्या एकाही खेळाडूला गोल करता आला नाही. पूर्ण वेळेनंतर स्कोअर लाइन 3-0 अशी राहिली आणि भारताने सामना जिंकला.

8व्या क्रमांकावर असलेल्या टीम इंडियाने मालिकेतील पहिल्या सामन्यात इंग्लंडविरुद्ध 1-1 आणि स्पेनविरुद्ध 2-2 अशी बरोबरी साधली. तिसऱ्या सामन्यात लालरेमसियामीच्या हॅट्रिकच्या जोरावर टीम इंडियाने इंग्लंडचा 3-0 असा पराभव केला आणि आता स्पेनवरही 3-0 अशी मात केली. या संघाने गटात 8 गुणांसह अव्वल स्थान पटकावले आणि सुवर्णपदक जिंकले. रविवारी 12 संघांच्या हॉकी प्रो-लीगचा अंतिम सामना आणि कांस्यपदकाचा सामनाही बार्सिलोनामध्येच झाला. भारत आणि नेदरलँड्स तिसऱ्या क्रमांकाच्या सामन्यात भिडले, ज्यामध्ये टीम इंडियाने 2-1 ने विजय मिळवला. भारताकडून कर्णधार हरमनप्रीत सिंगने 15व्या मिनिटाला संघाला आघाडी मिळवून दिली. 25व्या मिनिटाला डच संघाकडून थियरी ब्रिंकमननेही गोल करून स्कोअर 1-1 असा केला. 3 क्वार्टरनंतरही स्कोअर लाइन बरोबरीत राहिली. त्यानंतर चौथ्या क्वार्टरच्या 50व्या मिनिटाला भारताच्या दिलप्रीत सिंगने गोल करत संघाला 2-1 अशी आघाडी मिळवून दिली. पूर्ण वेळ संपल्यानंतरही स्कोअर लाइन 2-1 अशीच राहिली आणि टीम इंडियाने कांस्यपदक जिंकले. स्पेनने सुवर्ण आणि इंग्लंडने रौप्यपदक जिंकले. रविवारी 12 संघांच्या हॉकी प्रो-लीगचा अंतिम सामना आणि कांस्यपदकाचा सामनाही बार्सिलोनामध्येच झाला. भारत आणि नेदरलँड्स तिसऱ्या क्रमांकाच्या सामन्यात भिडले, ज्यामध्ये टीम इंडियाने 2-1 ने विजय मिळवला. भारताकडून कर्णधार हरमनप्रीत सिंगने 15व्या मिनिटाला संघाला आघाडी मिळवून दिली. 25व्या मिनिटाला डच संघाकडून थियरी ब्रिंकमननेही गोल करून स्कोअर 1-1 असा केला. 3 क्वार्टरनंतरही स्कोअर लाइन बरोबरीत राहिली. त्यानंतर चौथ्या क्वार्टरच्या 50व्या मिनिटाला भारताच्या दिलप्रीत सिंगने गोल करत संघाला 2-1 अशी आघाडी मिळवून दिली. पूर्ण वेळ संपल्यानंतरही स्कोअर लाइन 2-1 अशीच राहिली आणि टीम इंडियाने कांस्यपदक जिंकले. स्पेनने सुवर्ण आणि इंग्लंडने रौप्यपदक जिंकले.

# निकोलस पूरनच्या 55 चेंडूत 137 धावा

## MI न्यूयॉर्क मेजर लीग T20 च्या फायनलमध्ये विजयी

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**MI न्यूयॉर्कने अमेरिकेच्या मेजर लीग T20 चे पहिले विजेतेपद पटकावले आहे. या संघाने अंतिम फेरीत सिएटल ऑर्कास संघाचा 7 गडी राखून पराभव करून पहिले विजेतेपद पटकावले. MIचा कर्णधार निकोलस पूरनने 16 चेंडूत अर्धशतक झळकावल्यानंतर 40 चेंडूत शतक झळकावले. पुरनने 137 धावांवर नाबाद राहून आपल्या संघाला चॅम्पियन बनवले.**



डलास येथील ग्रँड पिअर स्टेडियमवर नाणेफेक हारल्यानंतर फलंदाजी स्वीकारताना ऑर्कास संघाने 20 षटकांत 9 गडी गमावून 183 धावा केल्या.

प्रत्युत्तरात एमआयने कॅप्टन पूरनच्या स्फोटक खेळीच्या जोरावर 16 षटकांत सामना जिंकला. ग्रँड पीअर स्टेडियमवर नाणेफेक गमावल्यानंतर फलंदाजी स्वीकारताना ऑर्कासला 5 व्या षटकातच पहिला धक्का बसला. सलामीवीर नौमन अन्वर 9 धावा करून बाद झाला. त्याच्यापाठोपाठ शेहान जयसूर्या 16 आणि हेनरिक क्लासेनही 4 धावा करून बाद झाले. एका टोकाकडून सातत्याने विकेट पडत होत्या, पण दुसऱ्या टोकाकडून क्विंटन डी कॉकने वेगवान धावा करत आपले अर्धशतक पूर्ण केले. 52 चेंडूत 87 धावा केल्यानंतर तो 17व्या षटकात बाद झाला, मात्र तोपर्यंत त्याच्या संघाची धावसंख्या 140 धावांच्या पुढे गेली होती.

डी कॉक बाद झाल्यानंतर ऑर्कास संघाकडून शुभम रंजनने 29, इमाद वसीमने 7 आणि ड्वेन प्रिटोरियसने 21 धावा केल्या. तर वेन पार्नेल 2, अँड्रयू टाय आणि हरमीत सिंग केवळ 1-1 धावा करू शकले आणि संघाने 20 षटकांत 9 गडी गमावून 183 धावा केल्या. MI कडून राशिद खानने अवघ्या 9 धावांत 3 बळी घेतले.

वेगवान गोलंदाज ट्रेंट बोल्टनेही 3 बळी घेतले. त्यांच्याशिवाय स्टीव्हन टेलर आणि डेव्हिड व्हीजे यांनाही प्रत्येकी एक विकेट मिळाली, तर एक फलंदाज धावबाद झाला. व्हीजेने 4 षटकात 65 धावा दिल्या. डेवाल्ड ब्रुईस 13व्या षटकात 20 धावा काढून धावबाद झाला. त्यानंतरही कर्णधार पूरन थांबला नाही आणि त्याने 40 चेंडूत शतक झळकावले. पूरनने 16व्या षटकात आपल्या संघाला 7 गडी राखून विजय मिळवून दिला.

### बोल्ट घेतल्या सर्वाधिक विकेट

मेजर लीग T20 स्पर्धा अमेरिकेत प्रथमच खेळली गेली. एमआय न्यूयॉर्क पहिले चॅम्पियन ठरला, संघाचा कर्णधार निकोलस पूरन सर्वाधिक धावा करणारा ठरला. त्याने 8 सामन्यात 388 धावा केल्या. एमआयचा ट्रेंट बोल्ट सर्वाधिक विकेट घेणारा गोलंदाज राहिला. त्याने 8 सामन्यात 22 विकेट्स घेतल्या, कॅमेरॉन गॅननंतर 11 विकेट्स मिळवून दुसऱ्या स्थानावर आहे.